नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०१/२०२५ (सोमवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे भिवापूरः– दि. १९/०१/२०२५ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, मुखबीव्दारे खात्रीशिर खबर मिळाली की, मौजा तहसिल कार्यालय समोर भिवापुर येथे रेतीची अवैद्यरित्या वाहतुक करित असल्याच्या खबरे वरुन स्टाफचे मदतीने मौजा तहसिल कार्यालय समोर भिवापुर येथे नाकाबंदी केली असता १० चक्का टिप्पर ट्रक क्र. एम एच –४०/वाय– ८४३३ येताना दिसला. सदर ट्रक थांबविण्याचा ईशारा केला असता ट्रक चालक ट्रक न थांबविता पळुन गेला वाहनाचा पाठलाग केला असता वाहन चालकाने ट्रक रस्त्याच्या कडेला थांबविले. सदर ट्रकची पाहणी केली असता ट्रकमध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने वाहन चालक **नामे दर्शन देवेन्द्र देशमुख वय २२ वर्ष, रा. वलनी ता पवनी जि भंडारा** याला रेतीच्या परवाना बाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितल्याने आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्र. एम –एच ४० –वाय– ८४३३ किंमती २०,००,००० रूपये व त्यामध्ये सहा ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे भरलेली अंदाजे किंमती ३०,००० रू असा एकुण २०,३०,०००/– रू चा माल घटणास्थळावर जप्त करण्यात आला आहे. **आरोपी १) चालक नामे दर्शन देवेन्द्र देशमुख वय २२ वर्ष, रा. वलनी ता पवनी जि भंडारा २). मालक आकाश माधव पंचभाई रा. वलनी ता. पवनी जि. भंडारा** यांचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५), भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खान आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. सहकलम २३९, १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

पोस्टे रामटेक:— दिनांक १९/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, रामटेक हद्दीतील खिंडसी रोडवरील उबंटु हॉटेल समोर अवैधरीत्या विनापरवाना रेतीची वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून खिंडसी रोडवरील उबंटु हॉटेल समोर नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचे १२ चाकी ट्रक क्र. एम.एच.४०/बी. एफ.५३५९ चा चालक **आरोपी नामे— विशाल सुरेश सेलोकर वय २४ वर्षे रा. सालई बुर्ज ता. मोहाडी जि. भंडारा** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता त्याचेकडे ०४ ब्रास रेती मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून १२ चाकी ट्रक क्र. एम.एच.४०/बी. एफ. ५३५९किमती ५०,००,०००/—रू. चे पांढ—या रंगाचा कॅबीन व निळया डाल्यामध्ये ४ ब्रास रेती किंमती १२,०००/रू. असा एकुण ५०,१२,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी चालक नामे— **विशाल सुरेश सेलोकर वय २४ वर्षे रा. सालई बुर्ज ता. मोहाडी जि. भंडारा** यांचे विरुद्ध पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ३०३(२) भा. न्या. सं. सह कलम ४८(७), ४८(८) महा. जमीन महसुल अधि.१९६६ सह कलम ४/२१ खान खनिज अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**पोलीस माहिति कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**